॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

www.veerbhuminews.com

✻ **सुविचार** ✻
जेथे अहंकार आहे,
तेथे स्नेह आणि प्रेम नाही.




▪ अहिल्यानगर ▪ गुरुवार, दि. ५ जून २०२५ ▪ वर्ष ६ वे ▪ अंक ५२ वा ▪ पाने ४ ▪ किंमत ३ रुपये ▪ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 ☏ 9420802145

**SPOT NEWS**

## राज्यात यंदा दहा कोटी वृक्ष लागवड

● **मुंबई** – राज्यातील वनाच्छादनाची टक्केवारी वाढविण्यासाठी 'हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र' या अभियानाअंतर्गत यावर्षी राज्यात १० कोटी वृक्ष लागवड करण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी केली. पुढील वर्षीही १० कोटी वृक्ष लागवड करण्याचे उद्दिष्ट आहे. वृक्षारोपण ही लोकचळवळ झाली तरच ही मोहीम यशस्वी होईल. त्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे काम करावे, अशा सूचना मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिल्या. या बैठकीला उपमुख्यमंत्री अजित पवार, वन मंत्री गणेश नाईक, राज्यमंत्री आशीष जयस्वाल आदी उपस्थित होते. हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र अभियानांतर्गत वृक्ष लागवड मोहिमेसंदर्भात सह्याद्री अतिथीगृह येथे फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली, त्यावेळी ते बोलत होते. राज्यातील ३३ टक्के वनाच्छादनाचे उद्दिष्ट गाठण्यासाठी पुढील २० वर्षे हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र हे अभियान मोहीम स्वरूपात राबविणे आवश्यक आहे. महाराष्ट्राने गेल्या आठ वर्षांत मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड केली आहे. यापूर्वी ३३ कोटी आणि ५० कोटी झाडे लावण्याचे उद्दिष्ट यशस्वीपणे गाठले आहे. त्यामुळे यंदाच्या वर्षीचे उद्दिष्ट नक्कीच पूर्ण करता येईल. वृक्षारोपणात किमान दीड ते तीन वर्षे वयाची रोपे लावण्यात यावीत. लावलेली झाडे टिकतील, वाढतील यासाठी प्रयत्न व्हावेत. तसेच लावलेल्या वृक्षारोपणाची जगण्याची टक्केवारी वाढावी, यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा. तसेच यासाठी रिमोट सेन्सिंग, उपग्रह आदी साधनांचाही वापर करून पारदर्शकपणे कामे होण्याकडे लक्ष द्यावे, अशा सूचना फडणवीस यांनी दिल्या.

## उद्धव ठाकरे गटाचे पाच खासदार शिंदेंच्या संपर्कात?

● **मुंबई** – गेल्या काही दिवसांपासून राज्याच्या राजकारणात मोठ्या घडामोडी घडत आहेत. अनेक नेते आपल्या सोईच्या पक्षांत उडी घेत आहेत. असे असतानाच आता उद्धव ठाकरे यांच्या पक्षातील एकूण ५ खासदार एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या संपर्कात आहेत, अशी माहिती सूत्रांकडून मिळत आहे. विशेष म्हणजे या खासदारांना पक्षात थांबवण्याचा प्रयत्न उद्धव ठाकरे यांच्या पक्षाकडून केली जात असल्याचेही सूत्रांनी सांगितले. येत्या २७ जुलैपासून संसदेचे पावसाळी अधिवेशन चालू होणार आहे. हे अधिवेशन चालू होण्यापूर्वीच किंवा हे अधिवेशन चालू असताना हे ऑपरेशन टायगर पूर्ण होण्याची शक्यता सूत्रांनी व्यक्त केली.

# आरसीबीच्या विजयाचा जल्लोष जीवावर बेतला

## बंगळुरूत चेंगराचेंगरी झाल्याने ११ जणांचा मृत्यू । गर्दीने रस्ते झाले जाम

● **बंगळुरू । वीरभूमी–**

तब्बल १८ वर्षांनंतर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने आयपीएलचे जेतेपद पटकावले. यानंतर देशभरातील आरसीबीच्या चाहत्यांनी एकच जल्लोष केला. त्यानंतर आज आरसीबीचे होमग्राऊंड असलेल्या बंगळुरुतील एम. चिन्नास्वामी स्टेडियमच्या बाहेर चाहते जमले. या ठिकाणी चाहत्यांची एकच गर्दी उसळल्याने चेंगराचेंगरी झाली. यात ११ जणांचा मृत्यू झाला तर १५ पेक्षा जास्त जण जखमी असल्याने मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. या दुर्दैवी घटनेने आरसीबीच्या आयपीएल विजेतेपदाच्या सेलिब्रेशनला गालबोट लागले.

रजत पाटीदार आणि विराट कोहलीच्या आरसीबीने फायनलमध्ये श्रेयस अय्यरच्या पंजाब किंग्जचा पराभव करून आयपीएल २०२५ च्या चषकावर नाव कोरले. या विजयामुळे कर्नाटकसह विराटच्या चाहत्यांचा उत्साह प्रचंड आहे. त्यातच आरसीबीच्या आयपीएल विजेतेपदाचा जल्लोष साजरा करण्यासाठी बंगळुरुच्या चिन्नास्वामी स्टेडियममध्ये आज कार्यक्रम आयोजित केला होता. त्यामुळे आज बंगळुरुत अनेक चाहते चिन्नास्वामी स्टेडियमवर क्रिकेटपटूंची एक झलक पाहण्यासाठी जमा झाले होते. लाखोंची गर्दी उसळल्याने चिन्नास्वामी स्टेडियमच्या बाहेर चेंगराचेंगरी झाली. या चेंगराचेंगरीत ११ जणांचा मृत्यू झाला तर १५ हून अधिक जखमी झाल्याची माहिती आहे.



पंजाब किंग्जला गुजरातच्या नरेंद्र मोदी स्टेडियममध्ये ६ धावांनी पराभूत करत आयपीएलच्या १८ व्या हंगामाचे विजेतेपद जिंकले. यानंतर बंगळुरुत काल रात्रीपासून विजयाचा जल्लोष करण्यात येत आहे. त्यानंतर आज सायंकाळी ५ ते ६ च्या सुमारास चिन्नास्वामी स्टेडियमवर विजयी जल्लोष साजरा करण्यात येणार होता. मात्र, आरसीबीच्या चाहत्यांची मोठी गर्दी झाल्याने चेंगराचेंगरी झाली. या चेंगराचेंगरीत ११ जणांचा मृत्यू झाला असून ही संख्या देखील वाढू शकते.

चिन्नास्वामी स्टेडियमबाहेर चेंगराचेंगरी झाली. परंतु त्यानंतर मैदानावर आरसीबीच्या विजेतेपदाचा जल्लोष साजरा करण्यात आला. हा कार्यक्रम सायंकाळी ५ ते ६ वाजेदरम्यान आयोजित केला होता. या सोहळ्याला उपस्थिती लावण्यासाठी मोफत आणि मर्यादित पासेससाठी ऑनलाईन नोंदणीची सुविधा देण्यात आली होती. चिन्नास्वामी स्टेडियमच्या बाहेर गेट क्रमांक ३ जवळ ही चेंगराचेंगरीची घटना घडली.

बंगळुरूच्या चिन्नास्वामी स्टेडियममध्ये प्रवेश करण्याचा प्रयत्न करताना चेंगराचेंरी झाली. यावेळी परिस्थिती आटोक्यात आणण्यासाठी पोलिसांना बळाचा वापर करावा लागला. पोलिसांनी आरसीबीच्या चाहत्यांवर सौम्य लाठीचार्ज केला. मिळालेल्या माहितीनुसार चिन्नास्वामी स्टेडियमच्या गेट क्रमांक ३ जवळ चेंगराचेंगरी झाली.

चिन्नास्वामी स्टेडियमजवळ चाहत्यांची प्रचंड गर्दी उसळली होती. त्यामुळे स्टेडियमजवळचे रस्ते चाहत्यांच्या गर्दीने जाम झाले होते. यातून मोठी वाहतूक कोंडीही निर्माण झाली. आरसीबीची विजेती टीम विजयी जल्लोष साजरा करण्यासाठी मैदानात दाखल होत असताना हा प्रकार घडला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बंगळुरूमधील चेंगराचेंगरीबद्दल तीव्र दुःख व्यक्त केले. ही चेंगराचेंगरीची दुर्घटना अत्यंत हृदयद्रावक असल्याचे त्यांनी म्हटले. ही घटना अत्यंत दुःखद आहे. ज्यांनी आपल्या प्रियजनांना गमावले, त्यांच्यासोबत माझ्या संवेदना आहेत. जखमींनी लवकर बरे व्हावे, अशी मी प्रार्थना करतो, असे पंतप्रधान मोदी यांनी पीएमओ एक्स अकाउंटवरुन करण्यात आलेल्या पोस्टमध्ये म्हटले.

### चेंगराचेंगरीची न्यायिक चौकशी करण्याचे आदेश

▪ कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धारामय्या यांनी लोकांच्या गर्दीमुळे चेंगराचेंगरी झाली, असे सांगत मृतांच्या नातेवाईकांना १० लाख रुपयांची मदत देण्याची घोषणा केली. सरकार जखमींवर मोफत उपचार करणार आहे. आम्हाला या घटनेचे राजकारण करायचे नाही. मी या घटनेच्या न्यायिक चौकशीचे आदेश दिले आहेत.

## आघाडी होवो अथवा ना हो, तयारीला लागा

● **पुणे । वीरभूमी–**

विधानसभेच्या निवडणुकीत मोठा पराभव पदरी पडल्याने शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने आता स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये आपले अस्तित्व टिकवून ठेवण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत. याकरिता सातत्याने चर्चा व बैठका घेतल्या जात आहेत.

जिल्हा परिषद निवडणुकीसाठी विधानसभानिहाय निरीक्षकांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. जिल्हा कार्यकारिणीच्या बैठकीत आघाडी होवो अथवा ना हो स्वबळावर निवडणुकीची तयारी करण्याचा निर्णय घेण्यात आला.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शरदचंद्र पवार) नेते अनिल देशमुख अनेक वर्षे मंत्रिमंडळात होते. रमेश बंग, विजय घोडमारे, प्रकाश गजभिये हे आमदार होते. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसची जिल्ह्यात ताकद दिसत होती. आता मात्र पक्षाचा एकही आमदार शिल्लक राहिला नाही. त्यामुळे आता राष्ट्रवादी काँग्रेसने आता आपला सर्व फोकस जिल्हा परिषद आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीकडे वळवला आहे.

महायुतीप्रमाणे या निवडणुकांमध्ये महाविकास आघाडी राहील की नाही, असा प्रश्न राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाला देखील पडला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसने जागावाटपासाठी बरोबरीची अट टाकली आहे. ती काँग्रेसचे नेते मान्य करतील की नाही, याची कोणालाच शाश्वती नाही. मागील जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत दोन्ही काँग्रेस एकत्र लढल्या होत्या.

राष्ट्रवादीचे सहा जिल्हा परिषद सदस्य निवडून आले होते. सत्ता स्थापन झाल्यानंतर काँग्रेसने वाटा देण्यास राष्ट्रवादीला स्पष्ट नकार दिला होता. राष्ट्रवादीने उपाध्यक्षपदावर दावा केला होता. मात्र तोही फेटाळून लावला होता. शेवटी बड्या नेत्यांना यात हस्तक्षेप करावा लागला होता.

शेवटी एक सभापतिपद देऊन राष्ट्रवादीचे समाधान करण्यात आले होते. काँग्रेसचा अनुभव गाठीशी असल्याने राष्ट्रवादीच्या सर्वच नेत्यांनी सावध भूमिका घेतली आहे. जिल्हा परिषदेची निवडणूक जिंकायची असेल, तर दोन्ही काँग्रेसला एकत्र राहणे गरजेचे आहे. असे असले तरी काँग्रेसचे नेते आजही स्वत:ला मोठा भाऊ समजून राष्ट्रवादीला धाकात ठेवताना दिसत आहेत.

## २०२७ मध्ये होणार जातनिहाय जनगणना

### दोन टप्प्यांत नियोजन । मूळ जनगणनेत आता जातीचा कॉलम

● **नवी दिल्ली । वीरभूमी–**

जनगणना आणि जातीय जनगणनेला १ ऑक्टोबर २०२६ पासून सुरुवात होणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली. जनगणना आणि जातीय जनगणना ही २ टप्प्यांत होणार आहे. जम्मू काश्मीर, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड आणि लडाखमध्ये १ ऑक्टोबर २०२६ पासून जनगणना सुरू होणार आहे. पहिला टप्पा १ ऑक्टोबर २०२६ ला तर दुसरा टप्पा १ मार्च २०२७ पासून सुरू होणार आहे. यावेळी जनगणनेच्या कागदपत्रांमध्ये जातीचा कॉलम असेल, असेही सूत्रांनी सांगितले.

देशात जातनिहाय जनगणनेच्या मागणीला केंद्रातील मोदी सरकारने हिरवा कंदील दर्शवला. त्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कॅबिनेट बैठकीत आगामी जनगणनांमध्ये जातींच्या जनगणनेचा समावेश करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मात्र, जनगणना कधी होणार, हे निश्चित नव्हते. आता जनगणना करण्याची तारीख समोर आली असून दोन टप्प्यांत ही जनगणना होणार आहे. यामध्ये पहिला टप्पा १ ऑक्टोबर २०२६ रोजी, तर दुसरा टप्पा १ मार्च २०२७ पासून सुरू होणार आहे. यासंबंधीची माहिती सरकारी सूत्रांनी दिली.

जनगणना करणारे कर्मचारी प्रत्येक घरांत जाऊन लोकांची माहिती गोळा करतील, यामध्ये त्यांच्या जातीबाबतची माहिती देखील घेतली जाणार आहे. जातनिहाय लोकसंख्या जाणून घेणे, समाजातील विविध वर्गांची स्थिती जाणून घेणे हे त्यामागचे प्रमुख उद्दिष्ट आहे, असे सांगणयात आले.

### कोरोनामुळे जनगणना केली होती स्थगित

▪ भारतात २०११ मध्ये शेवटची जनगणना झाली होती. तत्पूर्वी दर १० वर्षांनी देशात जनगणना केली. त्यानुसार २०२१ मध्ये जनगणना होणे अपेक्षित होते. परंतु कोरोनामुळे केंद्र सरकारने जनगणनेचा निर्णय स्थगित केल्याचे सांगितले गेले. परंतु कोरोना झाल्यानंतरही जनगणना होऊ शकली नाही. यावरून विरोधकांनी सरकारला धारेवर धरले. तसेच जातनिहाय जनगणनेची मागणीही विरोधकांनी लावून धरली. त्यावर केंद्र सरकारने जातनिहाय जनगणना करण्याची घोषणा केली. आता २०२६ पासून जनगणना सुरू होणार आहे. त्यात जातनिहाय कॉलमही असणार आहे.

# समृद्धी महामार्गाच्या शेवटच्या टप्प्याचे आज लोकार्पण

● **मुंबई । वीरभूमी–**

राज्याची प्रगती अधिक गतीमान करण्यात दळणवळण सुविधांची व्यापक उभारणी महत्वाची बाब आहे. त्याला प्राधान्य देत शासन नागरिकांच्या प्रवास सुविधेच्या दृष्टीने अनेक प्रकल्प गतीने पूर्ण करत आहे. यामध्ये सर्वांत महत्वाचा ठरलेला ७०१ कि. मी लांबीचा हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग आता अंतिम टप्प्यासह पूर्णपण सुरु होत आहे.

एकूण ७०१ कि.मी पैकी ६२५ कि.मी लांबीचा हा महामार्ग सध्या वाहतुकीस सुरु असून आतापर्यंत जवळजवळ २ कोटी वाहनधारकांनी समृद्धी महामार्गाचा वापर केला आहे. आता, समृद्धी महामार्गाची उर्वरित ७६ कि.मी लांबीचे (इगतपुरी ते आमणे) लोकार्पण आज ५ जून २०२५ रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे हस्ते होत आहे.



विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रासह राज्यातील २४ जिल्ह्यांना कलाटणी देणाऱ्या हिंदू हृदयसम्राट बाळासाहेच ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गाच्या नागपूर ते शिर्डी या ५२० किलोमीटर लांबीच्या पहिल्या टप्याचे लोकार्पण प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ११ डिसेंबर २०२२ रोजी पार पडले. दुसऱ्या टप्याचे अहिल्यानगर जिल्ह्यातील शिडी (कोकणमठाण) ते नाशिक जिल्ह्यातील भरवीर इंटरचेंज दरम्यान एकूण ८० कि.मी लांबीचे लोकार्पण २६ मे २०२३ रोजी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले तर समृद्धी महामार्गाच्या भरवीर इंटरचेंज ते इगतपुरी पर्यंतच्या २५ किमीच्या तिसऱ्या टप्प्याचे लोकार्पण ४ मार्च २०२४ रोजी तत्कालीन सार्वजनिक बांधकाम मंत्री (सार्वजनिक उपक्रम) दादाजी भुसे यांच्या हस्ते झाले होते.

हा महामार्ग दिल्ली मुंबई द्रुतगती मार्ग, जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट आणि शिर्डी, अजिंठा वेरुळ लेणी, लोणार सरोवर आणि इतर पर्यटन स्थळांना जोडणारा आहे. देशाचे ग्रोथ इंजिन असणाऱ्या महाराष्ट्रासाठी हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग ही खऱ्या अर्थाने समृद्धीची भाग्यरेषा ठरणार आहे.

## २१ जुलैपासून संसदेचे पावसाळी अधिवेशन

● **नवी दिल्ली । वीरभूमी–**

केंद्र सरकारने आज पावसाळी अधिवेशनाच्या तारखा जाहीर केल्या आहेत. त्यानुसार संसदेचे या वर्षाचे पावसाळी अधिवेशन २१ जुलैपासून चालू होणार आहे. केंद्रीय संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी बुधवारी याबाबतची घोषणा केली. येत्या २१ जुलैला संसदेच्या पावसाळी अधिवेशनाला सुरूवात होईल. हे अधिवेशन १२ ऑगस्टपर्यंत चालणार आहे. मिळालेल्या माहितीनुसार या अधिवेशनात ऑपरेशन सिंदूरवर शासकीय नियमाअंतर्गत चर्चा होणार आहे.

तीन महिन्यांच्या विरामानंतर संसदेच्या दोन्ही सत्रांचे अधिवेशन २१ जुलैपासून चालू होईल. २१ जुलै रोजी सकाळी ११ वाजता अधिवेशनाला सुरूवात होईल. याआधी संसदेचे अधिवेशन ३१ जानेवारी रोजी चालू झाले होते. राज्यसभा आणि लोकसभेचे दोन्ही अधिवेशन ४ एप्रिल रोजी अनिश्चित काळासाठी संस्थगित करण्यात आले होते. २०२५ सालातील हे पाहिले अधिवेशन होते. आता २१ जुलै रोजी २०२५ सालाचे दुसरे अधिवेशन चालू होईल.

रिजिजू यांनी दिलेल्या माहितीनुसार या अधिवेशनात ऑपरेशन सिंदूरवर चर्चा होणार आहे. सरकारसाठी प्रत्येक अधिवेशन हे विशेषच असते. त्यामुळे या अधिवेशनात ऑपरेशन सिंदूरवरही चर्चा होईल, असे रिजिजू यांनी सांगितले. सर्वांनाच सोबत घेऊन आम्हाला हे अधिवेशन यशस्वी करायचे आहे. त्यासाठी आम्ही विरोधी पक्षांशीही संपर्क साधला आहे, अशी माहितीही त्यांनी दिली.

SPOT NEWS

## महेश नागरी पतसंस्थेत तज्ञ संचालकांची नेमणूक

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

भिंगार येथील महेश नागरी सहकारी पतसंस्थेच्या तज्ञ संचालकपदी संस्थेचे ज्येष्ठ संचालक डॉ. श्रीकांत गांधी आणि संस्थापक संचालक रतिलाल गुगळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या या नियुक्तीनिमित्त संस्थापक चेअरमन नंदकुमार झंवर (मन्नूशेठ), व्हाईस चेअरमन शांतीलाल मुनोत आणि संचालक मारुती पवार यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात संस्थेचे संस्थापक चेअरमन नंदकुमार झंवर यांनी उपस्थितांना संबोधित करताना संस्थेच्या तीन दशकामधील वाटचालीचा थोडक्यात आढावा घेतला. त्यांनी सांगितले, महेश नागरी पतसंस्था ही आज जेव्हा आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि विश्वासार्ह संस्था म्हणून ओळखली जाते, ते यामागे संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांची, संचालकांची आणि कर्मचाऱ्यांची कठोर मेहनत आहे. डॉ. गांधी व गुगळे यांची नियुक्ती संस्थेला अधिक व्यावसायिक आणि धोरणात्मक दृष्टिकोन देईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. संचालक मारुती पवार म्हणाले की, डॉ. श्रीकांत गांधी यांचा वैद्यकीय क्षेत्रातील अनुभव आणि व्यवस्थापन कौशल्य, तसेच रतिलाल गुगळे यांचा सहकार क्षेत्रातील सखोल अभ्यास, संस्थेच्या भविष्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरेल. दोघांचं मार्गदर्शन मिळणं म्हणजे संस्थेसाठी नवी ऊर्जा आणि नवी दिशा ठरणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सत्काराला उत्तर देताना डॉ. श्रीकांत गांधी यांनी संस्थेने दिलेली जबाबदारी मी पूर्ण विश्वासाने आणि प्रामाणिकपणे पार पाडणार आहे. सभासदांच्या हितासाठी आणि संस्थेच्या प्रगतीसाठी कार्यरत राहणे, हे सर्वोच्च ध्येय असणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. रतिलाल गुगळे यांनीही माझं सहकार चळवळीतील कार्य, संस्था उभारणीच्या काळातील अनुभव आणि या क्षेत्रातील कौशल्य वापरून मी संस्थेच्या प्रगतीसाठी कटिबद्ध राहणार असल्याचे सांगितले.

## प्रा. सुनिल धस यांचे आर.एस.पी. अधिकारी प्रशिक्षण पूर्ण

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

येथील प्रा. सुनिल चंद्रशेखर धस यांनी नुकतेच महाराष्ट्र राज्य गृह विभाग, पोलिस व शालेय शिक्षण विभागाच्या अंतर्गत महाराष्ट्र राज्य वाहतूक सुरक्षा व नागरी संरक्षण (आर. एस.पी.) अधिकारी हे दहा दिवसीय प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण केले. शहरातील पोलिस मुख्यालय येथे नुकतेच हे प्रशिक्षण पार पडले. सदर प्रशिक्षण पूर्ण करुन दिलेल्या विशेष योगदानाबद्दल प्रा. धस यांचा जिल्हा पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या हस्ते प्रमाणपत्र प्रदान देवून सत्कार करण्यात आला. याप्रसंगी माध्यमिक शिक्षण अधिकारी अशोक कडूस, पोलिस निरीक्षक उमेश परदेशी, वाहतूक शाखेचे पोलिस निरीक्षक बाबासाहेब बोरसे, संस्थेचे राज्यस्तरीय अध्यक्ष संजय शेंडे, उपाध्यक्ष पितांबर महाजन, विभागीय समुपदेशक सिकंदर शेख, जिल्हा समुपदेशक सोमनाथ बोंतले, उपजिल्हा समुपदेशक प्रकाश मिंड, कवायत प्रशिक्षक मुसा सय्यद यांनी प्रशिक्षणात मार्गदर्शन केले. प्रा. धस हे अहमदनगर जिल्हा मराठा संस्थेच्या ज्ञानोदय इंग्लिश स्कूल, नेवासा येथे इंग्रजीचे अध्यापक म्हणून कार्यरत आहेत. या प्रशिक्षणातंर्गत वाहतूक नियंत्रण, नागरी संरक्षण, मैदानी कवायत, अग्निशमन सेवा, प्रथमोपचार, योग, ध्यानधारणा व इतर आकस्मिक सेवा यांचे प्रशिक्षण देण्यात आले. या अभ्यासक्रमात इयत्ता पाचवी ते दहावी या वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना शिस्त व अनुशासन याचे धडे विशेष तासिका अंतर्गत मिळणार आहेत.

# संत महंतांकडून साधना करत भाविकांचे कल्याण

### माधवबाबा । शंकर महाराज मठामध्ये शुद्ध अष्टमीनिमित्त संत पुजन

**● पाथर्डी । वीरभूमी –**

दैनंदिन जगण्याला धर्माचा आधार असेल, तरच जीवनातील अडथळे व धोके ईश्वर कृपेने टाळता येऊ शकतात. संत महंतांनी साधना करत भाविकांचे कल्याण केले. विविध प्रकारच्या लीला कार्यातून धर्म विचारापासून दूर गेलेल्या लोकांना धर्मा चरणी बनविले, असे मत शंकर महाराज मठाचे संस्थापक माधवबाबा यांनी व्यक्त केले.

येथील शंकर महाराज मठामध्ये ज्येष्ठ शुद्ध अष्टमी निमित्त आयोजित कार्यक्रमात भाविकांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. शहरातील उद्योजक आनंदकुमार चोरडिया यांच्या हस्ते महापूजा व महाआरती करण्यात आली. चोरडिया परिवारातर्फे भाविकांना महाप्रसाद देण्यात आला. जिल्ह्याच्या विविध भागासह बीड, पुणे, संभाजीनगर, नाशिक आदीभागातून भाविक शंकर महाराज पूजा उत्सवाला उपस्थित होते. राज्यात फक्त पाथर्डीच्या मठातीलच शंकर महाराजांची मूर्ती काळ्या पाषाणाची असून या मठामध्ये शंकर महाराजांनी वापरलेला लोखंडी पलंग भाविकांच्या दर्शनासाठी उपलब्ध आहे. त्यामुळे राज्यातील शंकर महाराज भक्तांचे पाथर्डीचा मठ म्हणजे मोठे श्रद्धास्थान आहे.



माधव बाबा म्हणाले, दत्त संप्रदायातील प्रमुख सर्वच संत महंतांनी जनकल्याणासाठी अवतार घेत देशभर भ्रमंती करत भाविकांना धर्म मार्गाला लावले. शंकर महाराजांच्या लीला गूढ व अनाकलनीय अशा असून साधना मार्गात आल्यावर याची उकल होते. महाराजांच्या बावनी मध्ये वृद्धेश्वराचे स्थान महात्म्य असून शंकर महाराजांनी नाथ संप्रदायाच्या प्रथेप्रमाणे अलख अशा शब्दात भगवान शंकराला आवाज दिला. त्यावेळेस वृद्धेश्वराची पिंड सुद्धा जमिनीमधून वर आली. एवढा अधिकार असणाऱ्या अवतारी संताने पाथर्डी तालुक्याला मोठ्या भाग्याचा आशीर्वाद दिला आहे.

मिरी, मढी, तिसगाव, वृद्धेश्वर, पाथर्डी अशा पट्ट्यामध्ये त्यांचे काही काळ वास्तव्य राहिल्याने ही सर्व गावे पवित्र झाली आहेत. विविध संतांच्या पदस्पर्शाने व नाथसंप्रदायाच्या स्थापनेच्या भूमीला म्हणजे पाथर्डी तालुक्याला सर्वत्र देवभूमी म्हणून ओळखले जाते. या देवभूमीमध्ये जन्म घेण्यासाठी सुद्धा पूर्व जन्मीची पुण्याई लागते. प्रत्येक व्यक्तीला तिच्या जन्माबरोबरच तिचा धर्म जोडून आलेला आहे. ईश्वराने धर्मकार्यासाठी पुन्हा जन्म दिला, याची जाणीव ठेवूनच प्रत्येकाने धर्म मार्गाची कास धरून स्वतःसह समाजाचे कल्याण साधावे. हजारो वर्षे तपश्चर्या करत साधू संतांनी तालुक्याची भूमी पवित्र केली आहे. येथील कणाकणात ईश्वर तत्व आहे. दैनंदिन जगण्यातून धर्म बाजूला केल्यास माणसाचे आयुष्य म्हणजे पशु समान ठरते. प्रत्येकाने आपल्या धर्माचेच आचरण केले पाहिजे. जगाच्या पाठीवर कुठेही गेले तरी कल्याणासाठी मात्र धर्मच उपयोगी पडणार आहे. ईश्वराला स्वतःचे जीवन अर्पण करा. आपला गाडा तो चालवतो, मात्र त्यासाठी दृढ विश्वास व ईश्वर ठेवील तसे राहण्याची मानसिकता असावी. आपल्या प्रत्येक श्वासावर ईश्वराने ईश्वरी संदेश लिहिलेला आहे. शंकर महाराजांच्या उपासनेतून लाखो भाविकांनी प्रचिती घेतली असून या सेवा कार्यामुळे दैनंदिन जीवनामध्ये सुद्धा सर्व संकटांचा सामना करण्याची शक्ती आपोआप प्राप्त होते. वैश्विक कल्याणाच्या भावनेने केलेली साधना ईश्वराकडून लवकर स्वीकारली जाते. असे माधव बाबा म्हणाले. मठामध्ये दिवसभर बाहेर गावाहून आलेल्या भाविकांकडून संत पूजन सोहळा करण्यात आला.

## गोधेगाव येथील रखडलेला हाडोळ रस्ता विवेकभैय्या कोल्हे यांच्या प्रयत्नातून अखेर सुरू : वाकचौरे

**● कोपरगाव । वीरभूमी –**

गोधेगाव येथील मागील वीस वर्षांपासून रखडलेला हाडोळ रस्ता अखेर सुरु करण्यात आला असून यामागे कोल्हे कारखाना अध्यक्ष युवानेते विवेकभैय्या कोल्हे यांचे मोलाचे प्रयत्न आहेत. या रस्त्याचा उपयोग प्रामुख्याने गोरगरीब शेतकरी व मागासवर्गीय समाजबांधवांना शेतीसाठी ये-जा करण्यासाठी होत असून, रस्ता बंद असल्याने शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता.या समस्येने सर्व त्रस्त झालेले होते मात्र आता काम मार्गी लागल्याने सर्वत्र आनंदाचे वातावरण झाले आहे अशी प्रतिक्रिया प्रगतशील शेतकरी भाऊसाहेब वाकचौरे यांनी दिली आहे.

गोधेगाव येथील भाऊसाहेब वाकचौरे, राजेंद्र हुसळे, नामदेव वाकचौरे महाराज, विष्णू हुसळे, चांगदेव हुसळे, प्रल्हाद दुशिंग, रामभाऊ वाकचौरे, रामदास गोरे, लक्ष्मण वाकचौरे, पवन सोळशे, भाऊसाहेब शिरसाट, भिमराज हुसळे, कैलास हुसळे, राहुल लालवाणी, सुभाष कानडे व रवींद्र रांधवणे या शेतकऱ्यांनी सातत्याने विवेकभैय्या कोल्हे यांच्याकडे रस्त्याच्या कामासाठी पाठपुरावा केला.

या मागणीची दखल घेत विवेकभैय्या कोल्हे यांनी वरिष्ठ प्रशासन पातळीवर सातत्याने पाठपुरावा करत रस्ता खुला करण्यासाठी आवश्यक ते सर्व प्रयत्न केले. त्यांच्या या प्रयत्नांना यश येत, अखेर अत्यंत आवश्यक असलेला हा रस्ता सुरु करण्यात आला.

या कामात कोपरगावचे तहसीलदार महेश सावंत, मंडल अधिकारी अनिल मांढरे व तलाठी सय्यद मॅडम यांनी प्रशासनाकडून सकारात्मक भूमिका घेत, शिस्तबद्ध पद्धतीने काम पार पाडले. मंडल अधिकारी व तलाठी यांनी प्रत्यक्ष ठिकाणी उपस्थित राहून उशिरापर्यंत रस्त्याचे काम पूर्णत्वास नेले. या रस्त्यामुळे स्थानिक नागरिक व शेतकरी वर्गात समाधानाचे वातावरण असून, त्यांनी विवेकभैय्या कोल्हे यांचे आभार मानले आहेत.

## निमगाव वाघात आनंद अनुभूती शिबिर उत्साहात

**● नगर । वीरभूमी–**

तणावमुक्त आणि आनंदी जीवन जगण्यासाठी आवश्यक असलेल्या मानसिक व शारीरिक तंदुरुस्तीचा आनंद अनुभूती शिबिराद्वारे अनुभव निमगाव वाघा ग्रामस्थांनी घेतला. नगर तालुक्यातील निमगाव वाघा येथे द आर्ट ऑफ लिव्हिंग संस्थेच्या वतीने, तसेच स्व. पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ आणि धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय यांच्या सहकार्याने पाच दिवसीय प्रशिक्षण शिबिर मोठ्या उत्साहात पार पडले.



गावातील बिरोबा मंदिराच्या सभा मंडपात पार पडलेल्या या शिबिरात आर्ट ऑफ लिव्हिंगचे प्रशिक्षक रामचंद्र लोखंडे व विशाल गावडे यांनी योग, प्राणायाम, सुदर्शन क्रिया आणि ध्यान याविषयी प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले. आधुनिक जीवनशैलीत वाढणाऱ्या ताण-तणावावर नियंत्रण मिळवण्यासाठी साधकांना उपयुक्त अशा तंत्रांचे प्रशिक्षण देण्यात आले.

शिबिराचे उद्घाटन डोंगरे संस्थेचे अध्यक्ष व ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे यांच्या हस्ते करण्यात आले. समारोपप्रसंगी त्यांनी शिबिरात मार्गदर्शन करणाऱ्या प्रशिक्षकांचा सत्कार केला. कार्यक्रमास सौरभ कापसे, सतीश जाधव, दिलीप फलके, रावसाहेब जाधव, डॉ. संदीप जाधव, सुरेखा जाधव, नामदेव भुसारे, बाबा डोंगरे, मयुर काळे, मंदा डोंगरे, मंगल गावडे आदी मान्यवर उपस्थित होते.

पै. नाना डोंगरे म्हणाले की, आजच्या धकाधकीच्या जीवनशैलीत मानसिक तणाव हे एक मोठे आव्हान बनले आहे. अशा स्थितीत आनंद अनुभूतीसारखे शिबिर मानसिक स्वास्थ्यासाठी अत्यंत उपयुक्त आहेत. हे शिबिर म्हणजे एक आनंदी जीवनाचा प्रवास आहे. समाजाला तणावमुक्त व सकारात्मक जीवनशैलीकडे नेणे हीच खरी सेवा आहे. गावकरी बांधवांनी दिलेला प्रतिसाद पाहता यापुढेही असे उपक्रम नियमित राबविण्याचा आमचा त्यांनी व्यक्त केला.

# रस्ता दुरुस्तीसाठी ग्रामस्थ करणार उपोषण

### गणोरे ग्रामपंचायतीचा ठराव । धांबोडी फाटा ते पिंपळगाव निपाणी शिवरस्ता दुरुस्तीची मागणी

**● अकोले । वीरभूमी–**

धांबोडी फाटा - शिंदाळी डोंगर - पिंपळगाव निपाणी शिवरस्ता आठ दिवसात मोकळा करण्यात येऊन वहातुक योग्य करा अन्यथा ग्रामस्थ उपोषणाला बसणार असल्याचा महत्त्वपूर्ण ठराव गणोरे ग्रामसभेत सर्वानुमते करण्यात आला. ठराव तहसीलदार यांना पाठवण्यात यावा. तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत इयत्ता पहिलीसाठी प्रवेश घेणाऱ्या मुलांच्या पालकांना नळपट्टी व घरपट्टी माफ करण्याचा ठराव ही यावेळी करण्यात आला.

ग्रामसभेच्या अध्यक्षस्थानी सरपंच संतोष आंबरे होते. ग्रामसभा ही गावातील विविध विकासाचे कामे करण्यासाठी निधी मिळवुन ते मार्गी लावण्यासाठी असते. परंतु ग्रामसभेसाठी नेहमीप्रमाणे वायरमन, तलाठी व विविध विभागाचे प्रतिनिधी उपस्थित नसल्याने सभेत नाराजी व्यक्त करण्यात आली.




सभेत २०२४-२०२५ वर्षाचा जमा खर्च तेरजेचे वाचन करण्यात आले. महात्मा राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना २०२५-२०२६ चा विकास आराखडा तयार करण्यात आला.

गावात विविध कार्यक्रमासाठी डीजेच्या आवाजाने रक्तदाबाच्या अनेक रुग्णांना त्रास होतो. यामुळे गावातून डीजे चा वापर पूर्ण बंद करण्यात यावा अशी लेखी तक्रार येथील पत्रकार रमेश दातीर यांनी केली. यासाठी गणपत दातीर गुरुजी यांनी अनुमोदन देउन डीजे गावातुन हद्दपार करावा, अशी सुचना केली. परंतु बंद न करता डीजेच्या आवाजावर मर्यादा घालण्यात यावी, असा ठराव करण्यात आला.

जलजीवन मिशन अंतर्गत नळ पाणी पुरवठ्याचा गावात वाडीवस्तीवर पोहोचवण्यासाठी आराखडा तयार करणे गरजेचे असताना गावात कुठे जलकुंभ, कुठे पाईपलाईन याचा थांगपत्ता नाही. गावातून जलजीवन योजना गायब असल्याचे दिसत असल्याची खंत ग्रामस्थांनी व्यक्त केली. ग्रामपंचायतीच्या मालकीच्या मालमत्ता, जमिन, रस्ते व धांबोडी ओढ्यांचे मोजमाप ग्रामपंचायतीकडे असणे गरजेचे आहे. यासाठी मोजणी करून त्याच्या खुणा निश्चित करण्याची मागणी सेवानिवृत्त मुख्याध्यापक गणपत दातीर यांनी केली. पिण्याच्या पाणीपुरवठ्याचे नियोजन नेहमीच बिघडत असल्याने ग्रामस्थांनी नाराजी व्यक्त केली. मोरेवाडी व पिंपळगाव मधला रस्त्यावर मुरूम टाकण्यात यावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली. ग्रामसभेत मोठ्या संख्येने ग्रामस्थांनी चर्चेत सहभाग घेतला होता. सुत्रसंचालन ग्रामपंचायत अधिकारी रोहिणी थोरात यांनी केले. शेवटी सरपंच संतोष आंबरे यांनी आभार मानले.

## विशाल माळी यांची वनसेवा मध्ये पदोन्नती!

**● कोपरगाव । वीरभूमी –**

जेऊर कुंभारी गावाचे सुपुत्र आणि आत्मा मालिक शैक्षणिक व क्रीडा संकुलाचे स्थानिक समिती सदस्य विशाल हनुमंत माळी यांची भारतीय वनसेवा मध्ये पदोन्नतीने निवड झाली असून या यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण आहे.



विशाल माळी यांनी यापूर्वी नाशिक, धुळे, अमरावती, नागपूर व अहिल्यानगर येथे विभागीय वनाधिकारी (दक्षता विभाग) म्हणून उल्लेखनीय सेवा बजावली आहे. त्यांची निष्ठा, उपक्रमशीलता आणि प्रशासनातील नैपुण्य यामुळे त्यांना अनेक पुरस्कारांनी गौरवण्यात आले आहे. मेळघाट वन्यजीव विभागात ACF असताना त्यांनी वाघांच्या शिकाऱ्यांविरोधात मोठी मोहिम राबवून ५४ पेक्षा अधिक शिकाऱ्यांना परराज्यातून अटक करून त्यांच्यावर कारवाई केली होती. या धाडसी कामगिरीसाठी महाराष्ट्र शासनातर्फे त्यांना सांगली येथे सुवर्णपदक देऊन सन्मानित करण्यात आले होते.

कोल्हापूर येथे कार्यरत असताना त्यांनी राधानगरी व दाजिपूर भागांत लोकसहभागातून बस ट्युरिझम सुरू केला होता. विशेष म्हणजे, आठवड्यातून एक दिवस अपंगांसाठी मोफत पर्यटनाची संधी उपलब्ध करून देत त्यांनी सामाजिक जाणिवेचे उत्तम उदाहरण घडवले. ते येवला येथील १९९४ सालच्या चौथ्या इयत्तेतील माजी विद्यार्थी आहेत. सध्या ते आत्मा मालिक करिअर अकादमी, कोकमठाण येथे प्रमुख सल्लागार व मार्गदर्शक म्हणून कार्यरत आहेत. श्री. माळी यांच्या यशाबद्दल आत्मा मालिक संस्थेचे अध्यक्ष नंदकुमार सूर्यवंशी, सरचिटणीस हनुमंतराव भोंगळे, सर्व विश्वस्त व पदाधिकारी, विविध शाखांचे प्रमुख, शिक्षकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी, तसेच जेऊर कुंभारी पंचक्रोशीतून अभिनंदन होत आहे.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर- ४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com


# SPOT NEWS

## बंदी असलेल्या प्राण्यांना कुर्बानीपासून टाळण्याचे आवाहन

**अहिल्यानगर । वीरभूमी –**
ईद–उल–अजहा निमित महाराष्ट्रातील परभणी जिल्ह्यात ऑल इंडिया उलेमा बोर्डची महत्त्वाची बैठक आयोजित करण्यात आली होती या बैठकीत राज्यातील कायद्यांनुसार कुर्बानीसाठी योग्य व अयोग्य प्राण्यांबाबत सविस्तर चर्चा झाली यावेळी ऑल इंडिया उलेमा बोर्ड नॅशनल जनरल सेक्रेटरी अंज़र अन्वर खान, महाराष्ट्र स्टेट सेक्रेटरी मौलाना जहिर अब्बास कासमी, जिल्हा अध्यक्ष परभणी मौलाना शेख जहांगीर नदवी, नांदेड़ ज़िला अध्यक्ष मुफ्ती शफीउद्दीन साहब, जालना ज़िला अध्यक्ष हाफिज हारून पठान ,प्रसिद्ध विधी तज्ञ ॲाड. डइम्तियाज अहमद खान, जाफर खान, मूसा खान, हाफिज आरिफ गुजराती, मुफ्ती कमर कासमी, मुफ्ती आसिफ अलहाशमी, हाफिज अनीस रहमान अज़ीझी, मुहिब उर्दू, मुहम्मद अब्दुल बाकी, मौलाना अब्दुलकुद्दूस मिली, अर्शद खान, मुफ्ती शेख आलमगीर, हाफिज मुश्ताक फरकानी, हाफिज शेख आलमगीर, हाफिज रिझवान, हाफिज शुऐब, हाफिज अब्दुलहक, मौलाना रईस अहमद, मुहम्मद शुऐब आदीसह अनेक इमाम व उलेमा उपस्थित होते. यावेळी उलेमांनी यावर भर दिला की, महाराष्ट्रत ज्या प्राण्यांची कुर्बानी कायदेशीरदृष्ट्या पूर्णपणे बंदी आहे. अशा प्राण्यांची कुर्बानी ही कायद्याचे उल्लंघन मानली जाईल व ज्यामुळे केवळ व्यक्तीच नव्हे तर संपूर्ण कुटुंबही कायदेशीर कारवाईच्या कचाट्यात अडकू शकते. त्यामुळे जनतेने अशाच प्राण्यांची कुर्बानी करावी, ज्यावर शासनाकडून कोणतीही बंदी नाही जसे की बकरा, बकरी, मेंढा, मेंढी व म्हैस इत्यादीची कुर्बानी करण्यात यावी व उपस्थितांनी सर्वांना आवाहन केले की, ईद–उल–अजहा साजरी करताना राज्यातील कायद्याच्या चौकटीत राहूनच साजरी करावी व बंदी असलेल्या जनावरांना टाळावे असे आव्हान ऑल इंडिया उलेमा बोर्डच्या वतीने करण्यात आले.

## परवानगी न घेता पाणीपुरवठा विभागाच्या कर्मचाऱ्यांनी खोदला

**अहिल्यानगर । प्रतिनिधी–**
रेल्वे स्टेशन भेवरी चाळ गवळीवाडा येथे माजी नगरसेवक



विजय गव्हाळे यांनी आमदार संग्राम जगताप यांच्या निधीतून सहा महिन्यापूर्वी संपूर्ण रस्ता काँक्रिटीकरण केला तेव्हा महापालिकेच्या पाणीपुरवठा विभाग व इतर विभागाने जमिनीखालचे कामे केलेली होती व आता पूर्ण झालेल्या रस्ता अचानक पणे कुठलीही परवानगी न घेता रस्ता खोदण्यात आला या अशा मनपा प्रशासनाच्या भोंगळ्या कारभारामुळे रस्त्याचे विद्रूपीकरण होत आहे. याला थांबवण्यासाठी प्रशासनाने कारवाई करण्यात यावी व रस्ते होण्यापूर्वीच कामे पूर्ण करण्यात यावी. शहरांमध्ये सध्या आमदार संग्राम जगताप यांच्या निधीतून शहरांमध्ये विकास होत आहे व हे रस्ते पूर्ण तत्वावर झाले की मनपा प्रशासनाच्या पाणीपुरवठा विभाग हा रस्ता खोदून पाईपलाईनचे काम करते मात्र या रस्त्याचे विद्रूपीकरण होऊन मोठ्या खड्ड्यात रूपांतर होते यामध्ये कोणतीही दुर्घटना घडते त्यामुळे रस्ता होण्यापूर्वी मनपा प्रशासनाने कामे पूर्ण करावी व जिथे रस्ता खोदण्यात येईल तेथे रस्ता बनवून देण्याची मागणी माजी नगरसेवक विजय गव्हाळे यांनी केली आहे.

# शेतीपूरक व्यवसायातून प्रगतीच्या मोठ्या संधी

### युवानेते विवेकभैय्या कोल्हे । संजीवनी उद्योग समूह व संजीवनी फार्मर्स फोरमचा शेतकरी मेळावा

**कोपरगाव । वीरभूमी–**
शेतकऱ्यांनी पारंपरिक शेतीसोबत पुरक व्यवसायाकडे वळावे. शेतीपूरक उपक्रम सुरू करून उत्पन्नाचे नवे स्रोत तयार करता येतात. अशा उपक्रमांमुळे शेतकऱ्यांचे आर्थिक सक्षमीकरण होईल, असे मत सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष विवेकभैय्या कोल्हे यांनी व्यक्त केले.

कोपरगाव बेट येथील राष्ट्रसंत जनार्दन स्वामी भक्तनिवास क्रमांक दोन येथे संजीवनी उद्योग समूह आणि संजीवनी फार्मर्स फोरम यांच्या सहकार्याने आयोजित शेतीपूरक व्यवसायातील संधी शेतकरी मेळाव्यात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार स्नेहलतताताई कोल्हे होत्या.

कार्यक्रमाची सुरुवात माजी मंत्री स्व. शंकरराव कोल्हे यांच्या प्रतिमेच्या पूजनाने झाली. प्रतिमा पूजन मा.आ.स्नेहलतताताई कोल्हे, युवानेते विवेकभैय्या कोल्हे आणि मत्स्य संस्थेचे उपाध्यक्ष अंबादास पाटोळे आणि शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष राजेंद्र कोळपे आणि



कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती साहेबराव रोहोम यांच्या हस्ते करण्यात आले.

बँक ऑफ इंडियाचे प्रतिनिधी नितीन ढसाळ, संदीप खेमनर आणि अविनाश जाधव यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. प्रारंभी संजीवनी ग्रुप हेड न्यू व्हेंचर्स संजीव पवार यांनी प्रास्ताविक केले. ते म्हणाले की, संजीवनी उद्योग समुहाचे अध्यक्ष बिपीनदादा कोल्हे आणि चेअरमन युवानेते विवेकभैय्या कोल्हे यांनी शेतकऱ्यांची आर्थिक क्रयशक्ती वाढवण्यासाठी विविध शेतीपूरक संधी उपलब्ध करून दिल्या आहेत त्याचा लाभ घेण्यासाठी शेतकरी बांधवांनी पुढाकार घ्यावा.

माजी आमदार स्नेहलतताताई कोल्हे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, स्व. शंकरराव कोल्हे यांनी भविष्यातील धोके ओळखून, शेतकऱ्यांना शेतीसाठी जोडधंद्याची संकल्पना दिली. महिलांसाठी बचतगटांच्या माध्यमातून आर्थिक शिस्तीचा पाया घातला आणि त्यांना स्वयंपूर्ण बनवण्यासाठी विविध दिशा दाखवल्या. आज महिलांनी बचतगटांबरोबरच शेतीपूरक व्यवसायातही योगदान द्यावे त्या उत्तम पध्दतीने आर्थिक प्रगती साध्य करू शकतात.

विवेकभैय्या कोल्हे यांनी सांगितले की, संजीवनी फार्मर्स फोरममार्फत शेतकऱ्यांना शेतीपूरक व्यवसायाचे मार्गदर्शन, प्रशिक्षण, विपणन आणि सुविधा एकाच छताखाली उपलब्ध करून दिल्या जात आहेत यावर माहिती दिली. मत्स्यशेती, केशर, मशरूम, कोरफड, रेशीम, बांबू यासारखे पर्याय शेतकऱ्यांना उपलब्ध आहेत.

मेळाव्याच्या शेवटी कोपरगाव औद्योगिक वसाहतीचे उपाध्यक्ष केशवराव भवर व इतर शेतकऱ्यांनी शेतीपूरक उद्योगांबाबत प्रश्न उपस्थित केले. त्याचे अभ्यासपूर्ण उत्तर विवेकभैय्या कोल्हे यांनी दिले. आभार बाजार समितीचे सभापती साहेबराव रोहम यांनी मानले.

## विहिरीमध्ये पडलेल्या शेतकऱ्याचा मृत्यू

**अकोले । प्रतिनिधी–**
अकोले तालुक्यातील वाशेरे गावाच्या पाचनई शिवारात अपूर्ण बांधकाम झालेल्या विहिरीच्या कडेने फेरफटका मारताना तोल जाऊन विहिरात पडलेल्या शेतकऱ्याचा मृत्यू झाला. बाळासाहेब गंगाधर वाकचौरे (वय ४५) असे मृत मृत बाळासाहेब शेतकऱ्याचे नाव आहे. मयत वाकचौरे हे रविवार दि. १ जून रोजी दुपारी दोन वाजेच्या सुमारास ही घटना घडली.

वाशेरे येथील बाळासाहेब वाकचौरे हे रविवारी दुपारी एक वाजता शेतात फेरफटका मारून येतो, असे सांगून घरातून गेले. मात्र, बराच वेळ होऊनदेखील ते परत न आल्याने घरच्यांनी त्यांचा शोध सुरू केला. दुपारी साडेतीन वाजता शेतातील विहिरीत ते पडलेले दिसले. शेतातील बांधावरून ते पाहणी करीत होते. विहिरीचे बांधकाम बांधाच्या बाजूने अपूर्ण अवस्थेत पडले होते. त्याच बाजूने तोल गेल्याने वाकचौरे विहिरीत पडले. स्थानिकांच्या मदतीने त्यांना बाहेर काढून तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी जाहीर केले. विशेष म्हणजे, त्यांच्या दोन्ही हातांना काळे व्रण दिसून आले. विहिरीत तोल जाऊन पडल्यावर त्यांनी कशाच्या तरी आधार घेत बराच वेळ लटकून जीव वाचवण्याचा प्रयत्न केला असावा, पण वेळेत मदत न मिळाल्याने अखेर हात सुटून ते विहिरीत पडल्याचा अंदाज व्यक्त होत आहे. शवविच्छेदनानंतर त्यांच्यावर वाशेरे येथील स्मशानभूमीत रविवारी रात्री १० वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, भाऊ, बहीण असा परिवार आहे.

## शासनाच्या लोक कल्याणकारी योजना प्रभावीपणे राबवा : जिल्हाधिकारी डॉ. आशिया

**पाथर्डी । वीरभूमी–**
अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीचे सुमारे ८० टक्के भागांचे पंचनामे झाले आहेत. उर्वरित पंचनामे आगामी चार दिवसांमध्ये होतील. धार्मिक पर्यटनाच्या दृष्टीने हा तालुका महत्त्वाचा असून भाविकांसाठी विविध योजना राबवण्यात येतील. तसेच केंद्र व राज्य शासनाच्या लोक कल्याणकारी योजना शहरी व ग्रामीण भागामध्ये प्रभावीपणे राबवण्यात याव्यात.अशा सूचना जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांनी सर्व विभाग प्रमुखांना दिल्या.

जिल्हाधिकारी पदाचा पदभार स्वीकारल्यानंतर प्रथमच डॉ. आशिया यांनी पाथर्डी तालुका दौरा केला. या दौऱ्यात त्यांनी तहसील कार्यालयामध्ये सर्व विभागांचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी प्रांताधिकारी प्रसाद मते, तहसीलदार उद्धव नाईक, मुख्याधिकारी संतोष लांडगे, सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवाजी तांबे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता राहुल कांबळे, कृषी अधिकारी महादेव लोंढे, वनाधिकारी अरुण साबळे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. भगवान



दराडे, वैद्यकीय अधीक्षक डॉ. सचिन दरंदले, महिला बालकल्याण विभागाच्या अंजली आहेर आदी विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी सर्व विभागांचा सविस्तर आढावा घेताना काही सूचना देखील केल्या.प्रामुख्याने केंद्र व राज्य सरकारच्या योजना तळागाळापर्यंत पोहोचवा.धार्मिक पर्यटनाच्या दृष्टीने देखील या तालुक्याला वेगळे महत्त्व आहे. यापेक्षाही अधिक वेगळ्या प्रकारच्या सुविधा भाविकांना मिळाव्यात यासाठी पालकमंत्री व इतर लोकप्रतिनिधींच्या सोबत चर्चा करून जिल्हा नियोजन मधून निधी उपलब्ध करून देणे संदर्भात प्राधान्य दिले जाईल. अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करण्याचे काम सुरू असून उर्वरित पंचनामे आगामी चार दिवसांमध्ये केले जातील. आज आपण तालुक्याला प्रथमच भेट दिली असून विविध विभागांना कामकाजाबाबत सूचना केल्या आहेत. पुढील वेळी तालुका दौऱ्यावर आल्यानंतर केलेल्या सूचनांच्या अंमलबजावणीचा पुन्हा आढावा घेऊ. असे जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी सांगितले. यानंतर पाथर्डी नगरपरिषदेच्या नूतन इमारतीला त्यांनी भेट देऊन पाहणी केली.

# पाण्यासाठी उंचखडक खुर्द ग्रामपंचायतीवर महिलांचा मोर्चा

### तीन महिण्यांपासून नळ योजनेचे पाणीच नाही । महिला संतप्त

**अकोले । वीरभूमी–**
अकोले तालुक्यातील प्रवरा काठावरील उंचखडक खुर्द गावच्या आदिवासी ठाकरवाडी वस्तीत सार्वजनिक नळपाणी योजनेचे पाणी मिळत नसल्याने वस्तीवरील सुमारे दीडशे ते दोनशे संतप्त तरुणी व महिलांनी उंचखडक खुर्द ग्रामपंचायत कार्यालयावर मंगळवारी हंडा मोर्चा काढला. रिकामे हंडे डोक्यावर घेऊन महिलांनी ग्रामपंचायत कार्यालयावर धडक दिली, मात्र त्यांचा हिरमोड झाला. कारण, मोर्चा येण्याआधीच ग्रामपंचायत कार्याल्यास टाळे लावलेले होते. ते पाहून या महिलांचा संताप अधिकच अनावर झाला. आपले गाऱ्हाणे ऐकण्यापूर्वीच सरपंच, उपसरपंच व सदस्यांसह ग्रामसेवकानेही कार्यालय बंद ठेवून पळ काढल्याने महिलांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

शेवटी काही वेळानंतर तेथे माजी सरपंच व राष्ट्रवादीचे जिल्हा उपाध्यक्ष डॉ. मनोज मोरे हे इतर कार्यकर्ते व काही ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांसह उपस्थित झाले, त्यानंतर महिलांचा रागाचा पारा



कमी झाला. 'पाणी आमच्या हक्काचे, नाही कोणाच्या बापाचे' अशा घोषणा देत ठाकरवाडीपासून ते उंचखडक खुर्द

गावातील ग्रामपंचायत कार्यालयावर महिला–तरुणींनी डोक्यावर व कमरेवर रिकामे हंडे घेऊन मंगळवारी मोर्चा नेला. नळपाणी योजनेचा गैरकारभार त्यांनी चव्हाट्यावर आणला. पाणी योजनेतून मोठी पाणी गळती होत असून, ती थांबविण्याकडे ग्रामपंचायतीचे दुर्लक्ष होत असून, दुसऱ्या बाजूला गेल्या काही दिवसांपासून ठाकरवाडीला पिण्यास पाणी नसल्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली. ३०० रुपये रोजगार बुडवून आंदोलन करावे लागत असल्याचे या महिलांनी सांगितले. वर्षातील फक्त तीन महिनेच पिण्यास पाणी मिळते. इतर दिवशी आम्हाला वणवण भटकंती करून डोक्यावरून पाणी वाहून आणावे लागते. पाणी देण्याची वेळ ठरलेली नसते. अनेकदा कामावर जाण्याच्या वेळीच पाणी सोडतात, मग रोजगार बुडवून पाणी भरावे लागते. मात्र, पाणीपट्टी वसुलीसाठी ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या पठाणी कारवाया सुरू असतात. ग्रामपंचायत कर्मचारी झोपा काढतात व परिसरातील लहान मुले पाण्याच्या टाक्यात सू करीत असल्याचा आरोप महिलांनी केला.

आक्रमक झालेल्या आंदोलक महिलांच्या प्रश्नांला उत्तरे देताना ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांची चांगलीच दमछाक झाली. दोन दिवसांत ठाकरवाडीतील नळपाणी पुरवठा योजना दुरुस्त करून सुरळीत पाणी पुरवण्यात येईल, असे आश्वासन ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांनी दिले. त्यानंतर रिकामे हांडे घेऊन महिला माघारी परतल्या व ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांनी सुटकेचा निः श्वास सोडला.

### ... तर पाणीपट्टी भरणार नाही

ग्रामपंचायतीच्या दुर्लक्षामुळे एकीकडे रस्त्यावर पाणी वाहत असताना, दुसरीकडे ठाकरवाडीत अनेक महिन्यांपासून प्यायला पाणीच नसल्याचे वास्तव महिलांनी लक्षात आणून दिले. नळपाणी योजनेतून नियमित व पूर्ण दाबाने पाणी उपलब्ध करुन दिल्याशिवाय पाणीपट्टी भरणार नसल्याचा इशारा महिलांनी दिला.

## पर्यावरण दिनाचे औचित्य साधून आठ सर्पाची निसर्गात मुक्तता



**नगर । प्रतिनिधी–**
शहरानजीक असलेल्या मेहेकरी सारोळा बारादरी शहापूर बारा बाभळी केतकी अशा विविध ठिकाणाहून नागरी वस्तीत आढळून आलेले नाग, घोणस, धामिन, कोब्रा, अजगर सरपाची सर्पमित्र कृष्णा बेरड पाटील यांनी धरलेले साप पर्यावरण दिनाचे औचित्य साधून आठ सर्प निसर्गात मुक्तता केली. सर्पमित्र कृष्णा पाटील बेरड यांनी वन अधिकारी खेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व साप निसर्गात मुक्त केले यावेळी सर्पमित्र कृष्णा पाटील बेरड समवेत ओम जंगम, मकरंद देशमुख, नवनाथ कापसे, आनंद दळवी, राहुल साळुंखे, ऋषिकेश खामकर आदी उपस्थित होते.

यावेळी सर्पमित्र कृष्णा पाटील बेरड म्हणाले की, नागरिकांनी काळजी घ्या साप जगवा निसर्ग वाचवा हे ब्रीद वाक्य म्हणत पावसाळ्याचे दिवस असल्याने नाग, घोणस, धामिन, कोब्रा, अजगर आधी विविध प्रजातीचे सर्प भरपूर प्रमाणात आढळून येतील तरी नागरिकांनी सरपांना न मारता सर्प आढळल्यास मो. ९३७००७५५५५ / ९६६५०७५५५५ सर्पमित्र कृष्णा पाटील बेरड यांना संपर्क करण्याचे आव्हान करण्यात आले.

# पैलवानला जात धर्म नसतो, त्यांच्यात हनुमानजींचा अंश

## महंत आदिनाथ महाराज शास्त्री । शेवगावात देवाभाऊ केसरी कुस्ती स्पर्धेचे उद्घाटन

**● शेवगाव । वीरभूमी –**

पैलवान मुलांमध्ये व वस्तादात हनुमानजीचे रुप दिसते. आपल्या संस्कृतीतील कुस्ती खेळाला चालना देण्यासाठी घेण्यात आलेला उपक्रम कौतुकास्पद आहे. अरुण मुंढे हे स्वत: खेळाडू असल्याने त्यांनी खेळाडूंची खरी किंमत करून कुस्ती फड रंगवला. पैलवानला जात, धर्म नसतो, हनुमानजींचे अंश त्यांच्यात असते, या भरवलेल्या आखाड्याप्रमाणेच सातत्याने कुस्ती आखाडा घेण्यात यावा, असे आवाहन तारकेश्वर गडाचे महंत आदिनाथ महाराज शास्त्री यांनी केले.

शेवगाव येथे आयोजित केलेल्या देवाभाऊ केसरी कुस्ती स्पर्धेचे उद्घाटन तारकेश्वर गडाचे महंत आदिनाथ महाराज शास्त्री, ह.भ.प. राम महाराज झिंजुर्के व रेणुकामाता मल्टीस्टेटचे चेअरमन प्रशांत भालेराव यांच्या हस्ते करण्यात आले, यावेळी ते बोलत होते. यावेळी ज्ञानेश्वर महाराज बटूळे, भाजपचे प्रदेश चिटणीस तथा या स्पर्धेचे आयोजक अरुण मुंढे, जिल्हा तालीम संघाचे अध्यक्ष पै. वैभव लांडगे, खजिनदार पै. नाना डोंगरे, जिल्हा क्रीडा अधिकारी भाऊराव वीर, जगदीश धूत, विहिंपचे वंजारी सर, डॉ. निरज लांडे, नंदू मुंढे, तुषार वैद्य, अमोल सागडे, डॉ. कृष्णा देहाडराय, एकनाथ कुसळकर, अंकुश कुसळकर, कडूभाऊ मगर, कमलेश गांधी, दिगंबर काथवटे, माजी उपनगराध्यक्ष वजीर पठाण, विक्रम बारवकर, दिपक डावखर, रमेश दारकुंडे, विनोद मोहिते, सालार शेख, माऊली खेडकर, बाळासाहेब कोळगे, एकनाथ शिरसाठ, गणेश गर्जे, उदय मुंढे, सुनील जगताप, माजी सैनिक विनोद शेळके, पप्पू केदार, अंकुश ढाकणे, सोमा मोहिते, अभी बडे, अंबू पहिलवान, प्रकाश चित्ते आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रारंभी पहेलगाम येथील दहशतवादी हल्ल्यात जीव गेलेल्या निष्पाप नागरिकांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

यावेळी श्रीरेणुकामाता मल्टिस्टेटचे डॉ. प्रशांत भालेराव यांनी स्पर्धेला शुभेच्छा देऊन, शेवगाव तालुक्यात विविध क्रीडा स्पर्धांना प्रोत्साहन देण्याचे आवाहन केले. राम महाराज झिंजुर्के यांनी तरुणांनी शरीर संपदा कमविण्यासाठी




व्यायाम केला पाहिजे. कुस्तीने मन व शरीर सदृढ बनते. निरोगी आरोग्यासाठी कुस्ती खेळ खेळण्याचे सांगितले.

प्रास्ताविक करतांना अरुण मुंढे म्हणाले की, राजकारणात आल्यानंतर खेळाकडे दुर्लक्ष झाले, मात्र खेळाडूवृत्तीचा पिंड सोडला नाही. वंदे मातरम क्रीडा मंडळाच्या माध्यमातून युवकांना व्यायामाची आवड निर्माण होण्यासाठी व त्यांना दिशा देण्यासाठी व्यायामशाळा व कुस्ती संकुल उभारले. त्याचे उद्घाटन सोहळ्यासाठी मोठ्या प्रमाणात या कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. शेवगावमध्ये पहिल्यांदाच मोठ्या प्रमाणात कुस्त्याचे नियोजन करण्यात आले असून, या स्पर्धेत एक पंजाब केसरी तर तीन महाराष्ट्र केसरी एकाच आखाड्यात उतरणार असल्याचे त्यांनी सांगितले.

अहिल्यानगर जिल्हा तालीम संघ, शेवगाव तालुका तालीम संघ आणि वंदे मातरम क्रीडा व सांस्कृतिक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या या कुस्ती स्पर्धेत नगर जिल्ह्यासह राज्यातील २५० पेक्षा अधिक कुस्तीपटू कुस्ती स्पर्धेत सहभागी झाले आहेत. शहरातील खंडोबा मैदानावर कुस्तीचा थरार रंगला असून, परीसरातील कुस्तीप्रेमींनी पहिल्याच दिवशी कुस्ती पाहण्यासाठी मोठी गर्दी केली होती. उद्घाटनानंतर ४२, ४८, ५२, ५५, ६०, ६५, ७४, ८४ किलो आणि ८४ ते १२५ किलो ओपन गटातील कुस्त्यांना प्रारंभ झाला. गुरुवारी दि.५ जून रोजी निमंत्रित कुस्त्या होऊन बक्षिस वितरण होणार आहे.

कुस्तीचे समालोचन हंगेश्वर धायगुडे यांनी केले असून या कुस्त्या पंचप्रमुख रवी बोचरे यांच्या मार्गदर्शनाखाली होत आहेत.

# मनपाच्यावतीने कचरावेचकांना आरोग्यासाठी मार्गदर्शन

**● नगर । वीरभूमी –**

शहर स्वच्छ ठेवण्यासाठी सतत झटणाऱ्या कचरावेचकांचे आरोग्य व सुरक्षितता अबाधित रहावे, यासाठी अहिल्यानगर महापालिकेच्या वतीने शहरातील कचरावेचकांसाठी विशेष प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले. या शिबिराला कचरावेचकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमात कचरावेचकांना निरोगी आरोग्य राखण्यासाठी आवश्यक खबरदारी, विविध आजारांपासून बचावाचे उपाय, उपचारासाठी असलेल्या योजना तसेच केंद्र शासनाच्या नमस्ते योजना व अन्य कल्याणकारी योजनांची माहिती देण्यात आली.

शिबिरात अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था संघटक रमजान अली रंगरेज यांनी प्रत्यक्ष कचरा गोळा करताना घ्यावयाची काळजी, हातमोजे, मास्क, सॅनिटायझर वापराचे महत्त्व याबाबत प्रात्यक्षिकांसह माहिती दिली. उतारवयात होणाऱ्या



आजारांपासून बचाव, शारीरिक तंदुरुस्ती राखण्याचे उपाय यावरही विशेष मार्गदर्शन केले.

केंद्र शासनाच्या नमस्ते योजनेच्या माध्यमातून कचरावेचकांची नोंदणी सुरू आहे. या योजनेतून त्यांना रोजगार, विमा, आरोग्य तपासण्या, औषधोपचार व सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ मिळणार असल्याची माहिती देण्यात आली. यावेळी महापालिकेच्या घनकचरा विभागाचे लांडगे व कष्टकरी पंचायतचे जिल्हा समन्वयक विकास उडानशिवे, विकास धाडगे, मनोहर चखाले, विकास वाल्हेकर, सागर खुडे, रोहन साबळे, काळू खुडे आदींसह कचरा वेचक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शिबिराच्या आयोजनात महापालिका आयुक्त यशवंत डांगे, उपायुक्त संतोष टेंगले, सहाय्यक आयुक्त सपनाबेन वासवा, घनकचरा व्यवस्थापन प्रमुख अशोक साबळे, तसेच माजी नगरसेवक व कागद काच पत्रा कष्टकरी पंचायतचे अध्यक्ष भाऊसाहेब उडानशिवे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

# पाथर्डी पोलिस ठाण्यात बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर शांतता कमिटीची बैठक

**● पाथर्डी । प्रतिनिधी–**

येत्या ७ जून रोजी साजऱ्या होणाऱ्या बकरी ईद सणाच्या पार्श्वभूमीवर पाथर्डी पोलीस प्रशासनाच्या वतीने नुकतीच तालुक्यातील मुस्लिम समाजातील प्रमुख कार्यकर्त्यांची समन्वय बैठक घेण्यात आली. या बैठकीसाठी मुस्लिम समाजातील नागरिक, मौलाना, धर्मगुरू उपस्थित होते या बैठकीत सामाजिक सलोखा व कायदा–सुव्यवस्थेचे जतन यावर भर देण्यात आला.



राज्यात गोवंश हत्या बंदी कायदा लागू आहे. त्या अनुषंगाने येणाऱ्या बकरी ईदला कोणताही अनुचित प्रकार व घटना घडु नये. कुर्बानी देताना गोवंश जातीच्या जनावरांची कोणतीही कत्तल केली जाणार नाही, कुर्बानीसाठी बंदिस्त व संरक्षित जागेचा वापर करण्यात यावा, तसेच खुल्या ठिकाणी किंवा सार्वजनिक जागांवर कुर्बानी निषिद्ध असल्याचे स्पष्ट निर्देश पोलीस प्रशासनाने दिले. याशिवाय, इतर धर्मीयांच्या भावना दुखावणार नाहीत, याची सर्वांनी दक्षता घ्यावी व ईदचा सण उत्साहात आनंदात व शांततेत साजरा करावा असे आवाहन करण्यात आले.

यावेळी मौलाना सैफुद्दीन, दादाभाई चौधरी, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष नासीर शेख, लाला शेख, माजी नगरसेवक चांद मणियार, जुनेद पठाण, मुन्ना खलीफा, तिसगावचे इलियास सर, दिलावर बागवान, बशीर शेख, मन्सुर शेख, जुबेर आतार, वसीम मणियार, पापाभाई तांबोळी, इलियास बागवान, आरिफ कुरेशी आदी उपस्थित होते.

बैठक सकारात्मक वातावरणात पार पडली. धर्म, जात, पंथ या पलीकडे जाऊन सण साजरे करण्याचा आदर्श घालण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी पोलीस प्रशासनास पूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन देत पाथर्डी तालुका सौहार्दपूर्ण वातावरणात बकरी ईद साजरी करेल, असा विश्वास व्यक्त केला.

# थोरात यांच्या प्रयत्नातून आलेल्या निळवंडेच्या पाण्यामुळे तालुक्यात जलसमृद्धी

## रणजितसिंह देशमुख । अंभोरे, पिंपारणे, पानोडी, मालुंजे येथे मोठ्या उत्साहात बंधाऱ्यांचे जलपूजन

**● संगमनेर । वीरभूमी –**

निळवंडे धरण व कालव्यांचे निर्माते माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या प्रयत्नातून आणि पाठपुराव्यामुळे झालेल्या डाव्या व उजव्या कालव्यातून आलेल्या पाण्यामुळे संगमनेर तालुक्यांमधील विविध गावांमधील बंधारे व गावतळी भरण्यात आली आहे. यामुळे तालुक्यात जलसमृद्धी निर्माण झाली असल्याचे प्रतिपादन रणजितसिंह देशमुख यांनी केले असून तालुक्यातील विविध गावांमध्ये निळवंडे कालव्यांच्या पाण्याचे मोठ्या उत्साहात जलपूजन करण्यात आले.

अंभोरे, पानोडी, मालुंजे, पिंपरणे येथे राजहंस दूध संघाचे चेअरमन रणजितसिंह देशमुख यांच्या हस्ते उजव्या कालव्यातून भरण्यात आलेल्या बंधाऱ्यांचे जलपूजन करण्यात आले. यावेळी संचालक सतीश वर्पे, गंगाराम वाकचौरे, अण्णा राहिंज, लहानभाऊ वर्पे, रवींद्र रोहम, अरुणराव देशमुख, शुभम काळे, दिनकर वाकचौरे, नवनीत देशमुख, राजेंद्र देशमुख, सरपंच नारायण मरभळ, अरुण राहिंज, रमेश राहिंज, बाबासाहेब राहिंज, संजय राहिज, कृष्णा रकटे, भिमाजी राहिंज यांच्यासह विविध पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

उजव्या कालव्यातून कालव्या लगतच्या गावांना पाणी मिळावे याकरता सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून सुमारे दोन कोटी रुपयांचे पाईप देण्यात आले असून या माध्यमातून या गावांमधील बंधारे भरवण्यात आली आहे. या पाण्याने भरलेल्या बंधाऱ्यांचे जलपूजन मोठ्या आनंदाने करण्यात आले.

याप्रसंगी बोलताना रणजीतसिंह देशमुख म्हणाले की, विभागाच्या विकासाकरीता पाणी हे अत्यंत महत्त्वाचे असून माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी दुष्काळी भागाचा कायमचा पाणी प्रश्न सोडवावा याकरता निळवंडे धरण व कालवे पूर्ण केले. डावा आणि उजवा कालवा पूर्ण करण्यासाठी त्यांनी आमदारकी आणि मंत्रीपद पणाला लावले. मोठ्या कष्टातून हे ऐतिहासिक काम पूर्ण झाले आहे. आणि त्यांच्या पाठपुराव्यामुळे आणि प्रयत्नातून आज दोन्हीही कालव्यांमधून पाणी सुरू आहे. यामुळे या भागातील बंधारे पाण्याने भरून घेण्यात आली आहे. यामुळे शेतीसाठी मोठा उपयोग होणार असून पाण्यामुळे जलसमृद्धी निर्माण झाली आहे.

माजी मंत्री थोरात यांच्या प्रयत्नातून दुष्काळी तालुक्याचे रूपांतर प्रगतशील तालुक्यामध्ये झाली असून कृषी दुग्ध शिक्षण सहकार अशा सर्व क्षेत्रांमध्ये संगमनेर तालुका हा राज्याला दिशादर्शक ठरत असल्याचे ते म्हणाले.

अण्णासाहेब राहिंज म्हणाले की, ज्या लोकांनी धरणाला विरोध केला त्यांची आज सत्ता आहे. त्यांचे कालवे आणि धरणामध्ये कोणतेही योगदान नाही. निळवंडेचे पाणी तालुक्यातील



प्रत्येक गावात येणे हा तालुक्यासाठी आनंदाचा क्षण असल्याचे ते म्हणाले.

याप्रसंगी गावोगावी मोठ्या उत्साहात जलपूजन करण्यात आले यावेळी गावातील युवकांनी मिरवणूक काढून आनंद उत्सव साजरा केला.